सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# महा आवास अभियान-ग्रामीण

२० नोव्हेंबर २०२० ते २८ फेब्रुवारी २०२१

# मार्गदर्शक पुस्तिका



## राज्य व्यवस्थापन कक्ष
## ग्रामीण गृहनिर्माण

ग्राम विकास विभाग
महाराष्ट्र शासन

## अभियान ब्रोशर




## अभियान पोस्टर




# अभियान माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम

## अभियान होर्डींग / बॅनर



सत्यमेव जयते



**मा. ना. श्री. उध्दव बाळासाहेब ठाकरे**
**मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**

# शुभेच्छा

महाराष्ट्र शासनाने ग्राम विकास विभागाच्या राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून दिनांक २० नोव्हेंबर, २०२० ते २८ फेब्रुवारी, २०२१ या कालावधीत १०० दिवसाचे **'महा आवास अभियान– ग्रामीण'** राबविण्याचा स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. या अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी होईल आणि राज्याच्या ग्रामीण भागात बेघरांचे पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

राज्यात ग्रामीण भागामधील भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधणीसाठी जागा उपलब्ध करुन देणे, वाळूसहीत इतर बांधकाम साहित्यांची उपलब्धता, बहुमजली इमारती, गृहनिर्माण वसाहती, डेमो हाऊसेस, विभागीय भौगोलीक परिस्थितीनुसार घरांची रचना, नैसर्गिक आपत्तीरोधक घरे, नवनवीन तंत्रज्ञान, इत्यादी नाविन्यपूर्ण बाबींची या अभियान कालावधीत प्रभावी अंमलबजावणी होईल.तसेच शासनाच्या इतर योजना जसे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, स्वच्छ भारत मिशन–ग्रामीण, जल जीवन मिशन, प्रधानमंत्री उज्वला योजना, उजाला योजना, सौभाग्य योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान, इत्यादींशी कृतीसंगम करुन घरकुलांच्या लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावणार आहे. या अभियानात उत्कृष्ट काम करणाऱ्यांची दखल घेवून त्यांना पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून सुरु होणाऱ्या या अभियानाच्या निमित्ताने मी राज्यातील सर्व समाज घटक जसे–शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी, पंचायतराज संस्था, कॉर्पोरेट संस्था, तंत्रशिक्षण संस्था, लाभार्थी व लोक यांना या अभियानामध्ये सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन करतो.

राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण या कार्यालयाने सदर अभियान प्रभावीपणे राबविण्सासाठी तयार केलेली ही 'मार्गदर्शक पुस्तिका' खऱ्या अर्थाने सर्व भागधारकांना अभियान अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक ठरेल व या अभियानामुळे ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात आपले राज्य अग्रस्थानी पोहचेल असा मला विश्वास आहे. **'महा आवास अभियान– ग्रामीण'** यास हार्दिक शुभेच्छा!

**उद्धव बाळासाहेब ठाकरे**

सत्यमेव जयते



**मा. ना. श्री. अजित पवार**
**उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**

# शुभेच्छा

देशात दरवर्षी २० नोंव्हेंबर हा 'राष्ट्रीय आवास दिन' म्हणून राबविण्यात येतो. या वर्षी प्रधानमंत्री आवास योजना–ग्रामीण अंतर्गत आवास दिनाचे औचित्य साधून राज्यात प्रधान मंत्री आवास योजना–ग्रामीण, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम विकास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी व त्यात गुणवत्ता आणण्यासाठी **'महा आवास अभियान– ग्रामीण'** राबविणेबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे, याचा मला आनंद वाटतो. या अभियानाव्दारे सर्वांच्या क्षमता बांधणीसाठी कार्यशाळा, माहिती, शिक्षण व संवादाचे उपक्रम याव्दारे सर्वांना सक्रिय सहभागी करुन घेण्यात येणार आहे.

'राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृहनिर्माण' कार्यालयाच्या माध्यमातून या आयोजित केलेल्या १०० दिवसाच्या अभियानातून राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्र अधिक गतीमान होणार आहे. या योजनांच्या यशस्वीतेसाठी शासकीय यंत्रणेबरोबर समाजातील सर्व घटक, जसे– स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था, खाजगी संस्था (Corporates), तंत्र शिक्षण संस्था, पंचायतराज संस्था, बँका, लोकप्रतिनिधी, लाभार्थी, लोक इत्यादींचा सक्रिय सहभाग असणे आवश्यक आहे. याकामी सर्व जिल्हा परीषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत पदाधिकारी व सदस्य यांच्या सक्रिय सहभागाबरोबर ग्राम विकास विभागाची क्षेत्रीय यंत्रणा आघाडीवर राहील असा मला विश्वास वाटतो. चांगले काम करणाऱ्यांना पुरस्कार देऊन त्यांच्या कामाचा गौरव करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाने या ग्रामीण गृहनिर्माण योजनांकरीता केंद्र व राज्याच्या माध्यमातून आतापर्यंत भरीव निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. 'राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृहनिर्माण' कार्यालयाकडून सदर अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी तयार करण्यात आलेली ही 'मार्गदर्शक पुस्तिका' सर्व क्षेत्रीय यंत्रणेस उपयुक्त ठरेल याचा विश्वास वाटतो. या निमित्तीने आता सुरु होत असलेल्या **'महा आवास अभियान– ग्रामीण'** यास हार्दिक शुभेच्छा!

**अजित पवार**



**मा. ना. श्री. हसन मुश्रीफ**
**मंत्री, ग्राम विकास, महाराष्ट्र राज्य**

# शुभेच्छा

राज्यातील एकूण लोकसंख्येचा महत्वाचा भाग असलेल्या ग्रामीण भागात ग्राम विकास विभागाच्या माध्यमातून विविध ग्रामीण आवास योजनांमधून शासन बेघरांना सर्व सुविधांनी युक्त असा हक्काचा निवारा पुरविण्यात यशस्वी होत आहे. यामध्ये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना– (ग्रामीण), राज्य पुरस्कृत रमाई, शबरी, पारधी, आदिम आवास योजना, इत्यादी ग्रामीण गृहनिर्माण योजनांबरोबर जागा नसलेल्या लाभार्थ्यांना पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, शासकीय जागा विनामुल्य उपलब्ध करुन देणे व अतिक्रमणे नियमानुकूल करणे या योजना राबवण्यात येत आहेत.

राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृहनिर्माण हे कार्यालय या ग्रामीण गृहनिर्माण योजना यशस्वीरीत्या राबवत असून दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते २८ फेब्रुवारी २०२१ या कालावधीत **'महा आवास अभियान–ग्रामीण'** चे आयोजन केले आहे. राष्ट्रीय आवास दिनाच्या निमित्ताने सुरु होणाऱ्या या अभियानाव्दारे ग्रामीण गृहनिर्माण योजनांना अधिक गतिमानता येऊन गुणवत्ता वाढीमध्ये सुधारणा होणार आहे. या अभियानात सर्वांची क्षमताबांधणी करण्यासाठी कार्यशाळा, जनजागृतीसाठी माहिती शिक्षण व संवादाचे उपक्रम व अभियान उपक्रमांवार भर देण्यात येणार आहे. तसेच अभियानात उत्कृष्ट काम करणाऱ्यांना पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात येणार आहे. या अभियानात ग्राम विकास विभागाच्या अधिनस्त सर्व यंत्रणा मनापासून सक्रिय सहभागी होऊन हे अभियान यशस्वी करतील याचा मला विश्वास वाटतो.

अभियान कालावधीमध्ये पंचायत राज संस्था (जिल्हा परीषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत), स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था, कॉरपोरेट संस्था, लाभार्थी व लोकसहभाग यांच्या माध्यमातून मूलभूत सुविधा देवून 'आदर्श घरांची' निर्मिती करण्यात येईल याची मला खात्री आहे.

राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृहनिर्माण या कार्यालयाने विकसीत केलेली अभियान अंमलबजावणीसाठीची 'मार्गदर्शक पुस्तिका' राज्यातील सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी यांना पदोपदी मार्गदर्शन करेल याची खात्री आहे. **'महा आवास अभियान– ग्रामीण'**ला माझ्या हार्दिक शुभेच्छा!

**हसन मुश्रीफ**

सत्यमेव जयते



**मा. ना. श्री. अब्दुल सत्तार,**
**राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल, महाराष्ट्र राज्य**

# शुभेच्छा

महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास विभागाचे राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृहनिर्माण या कार्यालयाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बेघरांना घर देण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना–ग्रामीण त्याचबरोबर रमाई, शबरी, पारधी, आदिम आवास योजना अशा अनेक ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येत आहेत. या योजना अधिक गतीमानपणे अंमलात आणण्यासाठी व त्यामध्ये गुणवत्ता आणणेसाठी राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृहनिर्माण या कार्यालयाने **'महा आवास अभियान– ग्रामीण'** राबविण्यात पुढाकार घेतला याबद्दल मला फार आनंद वाटतो.

लाभार्थ्यांना घरकुलासाठी आवश्यक बांधकाम साहित्य उदा. वाळू उपलब्ध होणेसाठी शासनाच्या महसूल विभागाच्या शासन निर्णय व शासन राजपत्रानुसार महसुल यंत्रणेची मदत मिळेलच याचा मला विश्वास आहे. शासनाच्या विविध ग्रामीण आवास योजना, इतर योजनांशी कृतीसंगम, नाविन्यपूर्ण उपक्रम इ. याबाबत अभियानाच्या माध्यमातून क्षेत्रीय यंत्रणा व लाभार्थ्यांमध्ये अधिक जागरुकता आणण्यासाठी व त्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी उत्कृष्ट काम करणाऱ्यांना पुरस्कार सुध्दा देण्याची कल्पना स्तुत्य आहे.

शंभर दिवसाच्या या अभियानामुळे ग्रामीण भागातील आवास योजनांच्या प्रगतीला अजून वेग येईल आणि फेब्रुवारी २०२१ अखेर पर्यंत १००% घरकुले पूर्णत्वास येऊन शासनाचे सर्वांसाठी घरे हे ध्येय साध्य होणार आहे असा मला विश्वास वाटतो..

राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडून अत्यंत काळजीपूर्वक तयार करण्यात आलेल्या, अभियान अंमलबजावणीसाठी उपयुक्त अशी 'मार्गदर्शक पुस्तिका' सर्वांना पथदर्शक राहील यात शंका नाही. **'महा आवास अभियान– ग्रामीण'** ला पुढील वाटचालीसाठी माझ्याकडून मन:पूर्वक शुभेच्छा !

**अब्दुल सत्तार**

सत्यमेव जयते



**मा. श्री. संजय कुमार, भा.प्र.से.**
**मुख्य सचिव**
**महाराष्ट्र शासन**

# शुभेच्छा

सर्वांसाठी घरे-२०२२ हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्यशासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधान मंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम विकास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना या राज्य पुरस्कृत योजना अभियान स्वरुपात राबविण्यात येत आहेत.

राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात सुरु असलेल्या कामास अधिक गती देण्यासाठी, त्यातील गुणवत्तावाढीसाठी दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते २८ फेब्रुवारी २०२१ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या **'महा आवास अभियान- ग्रामीण'** च्या संकल्पनेबाबत मला आनंद वाटतो.

या शंभर दिवसाच्या अभियान कालावधीत सर्व भागधारकांची क्षमता बांधणी, माहिती, शिक्षण व संवाद या बाबींवर भर देऊन अभियानाची उद्दिष्टे साध्य करता येतील. उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था/व्यक्तींना पुरस्कार देवून त्यांना प्रोत्साहीत करण्यात येणार असल्याने ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अधिक प्रगती होईल याची मला खात्री वाटते.

केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत या गृहनिर्माण योजनांशी संबंधीत विभागांचे सचिव, राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित सर्व शासकीय यंत्रणा या १०० दिवसांच्या अभियानात सक्रीय सहभागी होऊन हे अभियान यशस्वी करतील याचा मला विश्वास वाटतो.

ग्राम विकास विभागाच्या राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयामार्फत विकसीत 'मार्गदर्शक पुस्तिका' सर्वांना अभियानाच्या प्रभवी अंमलबजावणीमध्ये मदत करेलच. यानिमित्ताने **'महा आवास अभियान- ग्रामीण'** या अभियानास माझ्या हार्दिक शुभेच्छा आणि अभिनंदन.

**संजय कुमार**

सत्यमेव जयते



**मा. श्री. राजेश कुमार, भा.प्र.से.**
**अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायतराज विभाग,**
**महाराष्ट्र शासन**

# शुभेच्छा

सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे या शासकीय धोरणानुसार राज्यामध्ये ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात काम सुरु आहे. संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत ध्येये (Sustainable Development Goals) मधील धोरण क्रमांक ११ नुसार किफारयतशीर गृहनिर्माण (Affordable Housing) क्षेत्रात काम झाल्यास एकूण १७ SDG पैकी किमान १४ SDG वर सकारात्मक प्रभाव पडणार आहे. यासाठी घरकुलांच्या कामाची प्रगती फक्त संख्यात्मक न राहता गुणात्मक रहावी, नावीन्यपूर्ण कल्पना अंमलात आणून लाभार्थ्यांना सर्व सुविधांनी युक्त असे घरकुल उपलब्ध करुन द्यावे, तसेच नैसर्गिक आपत्तीस सक्षमपणे सामोरे जाणारे घरकुल बांधण्यासाठी पुढाकार घ्यावा असे शासनाचे धेय्य आहे.

. त्या पार्श्वभूमीवर 'राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृह निर्माण' कार्यालयामार्फत महा आवास अभियान–ग्रामीण चे माध्यमातून भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधणीसाठी जागा उपलब्ध करुन देणे, वाळूसहीत इतर बांधकाम साहित्यांची उपलब्धता, बहुमजली इमारती, गृहनिर्माण वसाहती, डेमो हाऊसेस, विभागीय भौगोलीक परिस्थितीनुसार घरांची रचना, नैसर्गिक आपत्तीरोधक घरे, नवनवीन तंत्रज्ञान, इत्यादी बाबींवर लक्ष देण्यात येणार आहे.

तसेच शासनाच्या इतर योजना जसे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, स्वच्छ भारत मिशन–ग्रामीण, जल जीवन मिशन, प्रधानमंत्री उज्वला योजना, उजाला योजना, सौभाग्य योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान, इत्यादींशी कृतीसंगम करुन घरकुलांच्या लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावणार आहे असा मला विश्वास वाटतो.

यासाठी सर्व उपायुक्त (विकास), मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परीषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), गट विकास अधिकारी इ. सर्व ग्राम विकास यंत्रणेचा सक्रिय पुढाकार आवश्यक राहील. उत्कृष्ट कामासाठी पुरस्कार सुध्दा देण्यात येणार असल्याने त्यांच्या कामाची दखल घेतली जाणार आहे.

'राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृह निर्माण' कार्यालयाने अत्यंत काळजीपूर्वक विकसीत केलेल्या ही 'मार्गदर्शक पुस्तिका,' या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी मध्ये निश्चितच सर्वांना उपयुक्त राहील असा मला विश्वास वाटतो. या पुस्तिकेस व **'महा आवास अभियान – ग्रामीण'** या अभियानाच्या यशस्वीतेसाठी माझ्याकडून हार्दिक शुभेच्छा !

**राजेश कुमार, भा.प्र.से.**



**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण**

# मनोगत

महाराष्ट्र शासन हे ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, इतर मागास बहूजन कल्याण विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बेघरांना घर देण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना–ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, अटल बांधकाम कामगार ग्रामीण आवास योजना अशा अनेक योजना राबवित आहे. तसेच ग्रामीण गृहनिर्माण योजनेंतर्गत गरजू, पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याची योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना या मार्गाने जागा उपलब्ध करुन देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

सदर ग्रामीण गृहनिर्माण योजना 'राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृहनिर्माण' कार्यालयाच्या माध्यमातून राबविण्यात येत आहेत. राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या संचालक पदाचा कार्यभार स्विकारल्यावर या योजना अधिक प्रभावीपणे व गतीमानरीत्या राबविण्यासाठी धडक कार्यक्रम हाती घेण्याचे विचाराधीन होते. त्यासाठी २० नोव्हेंबर, २०२० रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून २० नोव्हेंबर २०२० ते २८ फेब्रुवारी २०२१ या १०० दिवसांच्या कालावधीत **'महा आवास अभियान – ग्रामीण'** राबविणेबाबत संकल्पना विकसित करण्यात आली, या संकल्पनेला सर्व संबंधितांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला आणि ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून यासंदर्भात दि. १९ नोव्हेंबर २०२० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

'सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे' या शासनाच्या धोरणांतर्गत अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी अधिक गतीमान करणे व गुणवत्ता आणने हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करणेबाबत 'राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण' कार्यालयावर जबाबदारी सोपविण्यात आली.

सदर शासन निर्णयातील सर्व बाबी/उपक्रम यांचा बारकाईने अभ्यास करुन 'राज्य व्यवस्थापन कक्ष –

ग्रामीण गृहनिर्माण' कार्यलयाने मागदर्शक सूचना विकसित केल्या असून या 'मार्गदर्शक सूचना' पुस्तक रुपात आणताना मला आनंद होत आहे. ही 'मार्गदर्शक पुस्तिका,' या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी मध्ये निश्चितच सर्वांना उपयुक्त राहील आणि अभियान १००% यशस्वी होईल असा मला विश्वास वाटतो.

या शंभर दिवसाच्या अभियान कालावधीत सर्व भागधारकांची क्षमता बांधणी, जनजागृतीसाठी माहिती, शिक्षण व संवाद या बाबींवर भर देऊन अभियानाची उद्दिष्टे साध्य करता येतील. लाभार्थ्यांना घरकुलासाठी आवश्यक बांधकाम साहित्य उदा. वाळू उपलब्ध होणेसाठी शासनाच्या महसूल विभागाच्या शासन निर्णय व शासन राजपत्रानुसार महसुल यंत्रणेची मदत मिळविणे, शासनाच्या विविध ग्रामीण आवास योजना, इतर योजनांशी कृतीसंगम, नाविन्यपूर्ण उपक्रम इ.राबविताना ही मार्गदर्शक पुस्तिका पथदर्शक ठरेल.

अभियान कालावधीमध्ये पंचायत राज संस्था (जिल्हा परीषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत), स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था, कॉरपोरेट संस्था, लाभार्थी व लोकसहभाग यांच्या माध्यमातून मूलभूत सुविधा देवून 'आदर्श घरांची' निर्मिती, बहुमजली इमारती, गृहनिर्माण वसाहती, डेमो हाऊसेस, विभागीय भौगोलीक परिस्थितीनुसार घरांची रचना, नैसर्गिक आपत्तीरोधक घरे, नवनवीन तंत्रज्ञान, आय.आय.टी. मुंबई सारख्या तांत्रिक संस्थाचे मार्गदर्शन, लाभार्थ्यांना बँकाकडून ७०,०००/– कर्ज उपलब्धता, विविध कार्यशाळा, आढावा बैठका, सभा, प्रशिक्षणे, क्षेत्रीय भेटी, लाभार्थी मेळावे, बँक मेळावे, गृहभेटी, ई.मेल, पत्रव्यवहार इत्यादी उपक्रम करावयाचे आहेत. सर्व भागधारकांचा सक्रिय सहभाग घेण्यासाठी, त्यांच्या जाणीव जागृतीसाठी विविध प्रकारची मिडीया जसे मास मिडीया, प्रिंट मिडीया, सोशल मिडीया, आऊटडोअर मिडीया, पारंपारीक मिडीया, गृप मिडीया, आंतरव्यक्ती संवाद या माहिती शिक्षण व संवाद च्या विविध उपक्रमांवरदेखील भर द्यावयाचा आहे.

'राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृहनिर्माण' या कार्यालयाने विकसीत केलेली अभियान अंमलबजावणीसाठीची ही 'मार्गदर्शक पुस्तिका' राज्यातील सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी यांना पदोपदी मार्गदर्शन करेल असा विश्वास वाटतो. या अभियानात उत्कृष्ट काम करणारे विभाग, जिल्हे, तालुके, ग्रामपंचायती, लाभार्थी. इत्यादींना पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. अभियान यशस्वी करण्यासाठी सर्व उपायुक्त (विकास), मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परीषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), गट विकास अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक इ. सर्व ग्राम विकास यंत्रणेचा सक्रिय पुढाकार राहील अशी मी आशा व्यक्त करतो.

शुभेच्छांसह!

**डॉ. राजाराम दिघे**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | शुभेच्छा संदेश | |
| i. | मा. ना. उध्दव बाळासाहेब ठाकरे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | |
| ii. | मा. ना. अजित पवार, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य | |
| iii. | मा. ना. हसन मुश्रीफ, मंत्री, ग्राम विकास, महाराष्ट्र राज्य | |
| iv. | मा. ना.अब्दुल नबी सत्तार, राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल, महाराष्ट्र राज्य | |
| v. | मा. श्री. संजय कुमार, भा.प्र.से., मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य | |
| vi. | मा. श्री. राजेश कुमार, भा.प्र.से. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासन | |
| vii. | मनोगत – डॉ. राजाराम दिघे, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण | |
| २ | अनुक्रमणिका | |
| ३ | प्रस्तावना | १ |
| ४ | 'महा आवास अभियान– ग्रामीण' राबविण्याचा उद्देश | १–३ |
| ५ | 'महा आवास अभियान– ग्रामीण' मध्ये राबवावयाचे उपक्रम | ४–११ |
| ६ | 'महा आवास अभियान– ग्रामीण'साठी क्षमताबांधणी कार्यक्रम | १२–१४ |
| ७ | 'महा आवास अभियान– ग्रामीण' यास गती देणेसाठी माहिती शिक्षण व संवाद (IEC) कार्यक्रम | १५–२० |
| ८ | प्रभावी अंमलबजावणी आणि सनियंत्रण | २१–२२ |
| ९ | 'महा आवास अभियान– ग्रामीण' दरम्यान राबविण्यात आलेल्या कार्यांचे मूल्यमापन | २२ |
| | परिशिष्ट अ | २३–२५ |
| | परिशिष्ट ब | २६ |
| | परिशिष्ट क | २७ |
| | परिशिष्ट ड | २८ |
| १० | 'महा आवास अभियान– ग्रामीण' दरम्यान करण्यात आलेल्या उत्कृष्ट कामाचा गौरव | २९–३२ |
| ११ | 'कोवीड–१९ च्या व्यवस्थापनाबाबत राष्ट्रीय मार्गदर्शक सूचना' या मथळ्याखाली नमूद सर्व सूचनांचे पालन | ३३ |
| १२ | 'महा आवास अभियान– ग्रामीण' अंमलबजावणीसाठीचा प्रशासकीय खर्च | ३३ |
| १४ | आचारसंहिता लागू असलेल्या क्षेत्रामध्ये आदर्श आचारसंहितेचे काटेकोरेपणे पालन | ३३ |
| १५ | विभाग निहाय – डेमो घरकुल मॉडेल | ३४–३५ |

# महा आवास अभियान–ग्रामीण च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचना

ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय दिनांक _ /११/२०२० अन्वये सन २०२०–२१ या वर्षामध्ये महाराष्ट्र राज्यात २० नोव्हेंबर, २०२० रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून २० नोव्हेंबर २०२० ते २८ फेब्रुवारी २०२१ या १०० दिवसांच्या कालावधीत **'महा आवास अभियान– ग्रामीण'** राबविणेबाबत मान्यता देण्यात आली आहे. सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घरे या शासनाच्या धोरणांतर्गत अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी अधिक गतीमान करणे व गुणवत्ता आणने हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार या अभियानामध्ये राज्यस्तरावरुन तसेच क्षेत्रीय पातळीवरुन संनियंत्रण व मुल्यमापन करण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

## १. प्रस्तावना :–

सर्वांसाठी घरे–२०२२ हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना–ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अशा विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येत असून त्यांना पूरक पंडित दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अतिक्रमण नियमानुकूल करण्याची योजना, अशा योजनाही स्वरुपात राबविण्यात येत आहेत.

सन २०१६–१७ ते २०१९–२० या कालावधीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना–ग्रामीण अंतर्गत केंद्र सरकारकडून राज्यास ८,०४,३२१ घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून, त्यापैकी आतापर्यंत ५,१२,०७० घरकुले पूर्ण झाली आहेत. तसेच राज्य पुरस्कृत योजनांतर्गत एकूण ४,३०,२२५ उद्दिष्ट असून त्यापैकी आतापर्यंत २,१०,७७२ घरकुलांचे काम पुर्ण झाले आहे. तर सन २०२०–२१ या वर्षाकरीता प्रधानमंत्री आवास योजना–ग्रामीण अंतर्गत एकूण ४,०५,०७७ घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे आणि सन २०२०–२१ या वर्षातही या योजना जोमाने राबविण्यात येत आहेत.

संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत ध्येये (Sustainable Development Goals) मधील धेय्य क्रमांक ११ नुसार किफायतशीर गृहनिर्माण (Affordable Housing) क्षेत्रात काम झाल्यास एकूण १७ SDG पैकी किमान १४ SDG वर सकारात्मक प्रभाव पडणार आहे. यासाठी घरकुलांच्या कामाची प्रगती फक्त संख्यात्मक न राहता गुणात्मक राहावी, नावीन्यपूर्ण कल्पना अंमलात आणून लाभार्थ्यांना सर्व सुविधांनी युक्त असे घरकुल उपलब्ध करुन द्यावे, तसेच नैसर्गिक आपत्तीस सक्षमपणे सामोरे जाणारे घरकुल बांधण्यासाठी पुढाकार घ्यावा असे शासनाचे ध्येय आहे.

## २. महा आवास अभियान– ग्रामीण राबविण्याचे उद्देश –

**i. राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे –**

महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बेघरांना घर देण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना–ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण ), पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अशा अनेक योजना राबविल्या जात आहेत. या योजना राज्य शासनाचे संबंधित विभाग जसे ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, इतर मागास बहूजन कल्याण विभाग, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, वित्त विभाग, महसूल व

वन विभाग, विभागस्तरीय यंत्रणा, जिल्हा स्तरीय यंत्रणा पासून गावापर्यंतच्या यंत्रणेने राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे.

**ii. ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये शासकीय यंत्रणेबरोबरच समाजातील सर्व घटक जसे – पंचायत राज संस्था, स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था, खासगी संस्था (Corporates), तंत्र शिक्षण संस्था, बँका, लोकप्रतिनिधी, लाभार्थी, ग्रामस्थ, इ. चा सक्रीय सहभाग वाढविणे :–**

महाराष्ट्र राज्यामधील ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रामध्ये विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना राबवताना समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग घेण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबविणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी या समाज घटकांसोबत बैठका आयोजित करणे, त्यांच्याशी चर्चा करणे, त्यांचे मार्गदर्शन घेणे वा त्यांची मते जाणून घेणे अशा प्रकारे त्यांचा भौतिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या व वैचारीकदृष्ट्या सहभाग करुन घेण्यासाठी राज्यस्तरापासून गावपातळीपर्यंत सर्व संबधितांनी अशा दृष्टीने प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे, ज्याव्दारे समाजातील या सर्व घटकांचा सक्रिय सहभाग या अभियानाला एक प्रभावी परिमाण देऊ शकतो.

**iii. ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रामध्ये नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून घरांचा दर्जा व गुणवत्ता वाढविणे :–**

भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधणीसाठी जागा उपलब्ध करुन देणे, वाळूसहीत इतर बांधकाम साहित्यांची उपलब्धता, बहुमजली इमारती, गृहनिर्माण वसाहती, डेमो हाऊसेस, विभागीय भौगोलीक परिस्थितीनुसार घरांची रचना, नैसर्गिक आपत्तीरोधक घरे, नवनवीन तंत्रज्ञान, इत्यादी बाबींवर लक्ष देणे तसेच ग्रामीण गवंडी प्रशिक्षणाच्या माध्यमातून राज्यामध्ये कुशल गवंडी तयार करुन दर्जेदार घरांची निर्मिती करणे आवश्यक आहे. या कामामध्ये आय.आय.टी. मुंबई सारख्या तांत्रिक संस्थाचेही मार्गदर्शन घेता येऊ शकेल. तसेच लाभार्थ्यांना बँकाकडून रु. ७०,०००/– कर्ज उपलब्ध करुन दिल्यास घरकुलाचा दर्जा अजून उंचावण्यास मदत होऊ शकेल. त्याच प्रमाणे घरकुलांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी कॉर्पोरेट संस्था, पंचायतराज संस्था इ. यांनी गुंतवणूक केल्यास घरकुलांचा दर्जा व गुणवत्ता यात वाढ होवू शकते.

याचप्रमाणे परराज्यात करण्यात आलेल्या अभ्यासदौऱ्यात आढळून आलेले खालील नाविन्यपूर्ण उपक्रम/निरीक्षणे राज्यात राबवून घरांचा व दर्जा व गुणवत्ता वाढविता येईल.

- घरकुलांच्या बांधकामाची गुणवत्ता टिकून राहण्यासाठी तालुकास्तरीय बांधकाम विभागामधील शाखा अभियंता, उप अभियंता यांना घरकुलाच्या प्रक्रियेत उलट तपासणीची जबाबदारी देणे.
- ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये बचत गटातील महिलांचे , अंगणवाडी सेविका तसेच सामाजिक कार्यकर्ते यांचे सहाय्य घेऊन विविध उपक्रम राबवून जनजागृती करणे.
- सर्व भागधारकांसाठी राज्यस्तरीय / विभागस्तरीय / जिल्हास्तरीय तक्रार निवारण प्रणाली / हेल्पलाईन सुरु करणे.
- ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरापासून ग्रामपंचायत स्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांनी क्षेत्रीय भेटी देऊन प्रत्यक्ष सहभाग वाढवणे.
- सोशल ऑडिटची प्रभावी अंमलबजावणी करणे.
- जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत एकत्र साहित्य खरेदी करुन प्रत्यक्ष लाभार्थ्यांना वितरीत करणे.
- समाजातील प्रतिष्ठित व्यक्तीच्या हस्ते घरकुलाचे भूमिपूजन करणे.
- जिल्हा व तालुकास्तरावर घरकुलाचे काम सुरु न करणाऱ्या लाभार्थ्यांचे मेळावे घेऊन अशा लाभार्थ्यांना काम सुरु करण्यासाठी प्रोत्साहित करणे.
- ग्रामपंचायत स्तरावर दर आठवड्याला जनसुनावणी घेऊन ज्या लाभार्थ्यांची घरकुले प्रलंबित आहेत अश्या

लाभार्थ्यांची नावे वाचून दाखवणे व त्यांना घरकुले पूर्ण करण्यासाठी योग्य ते सहकार्य आणि मार्गदर्शन करणे.

**iv. ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा कृतिसंगम (Convergence) घडवून आणने:–**

घरकुल लाभार्थ्यांचा जीवनमानात सुधारणा करण्यासाठी शासनाच्या इतर योजनाशीं कृतीसंगम (Convergence) करणे जसे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना मधून रोजगार. स्वच्छ भारत मिशन–ग्रामीण मधून शौचालय. जल जीवन मिशन मधून नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा. राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान मधून उपजिविकेचे साधन. प्रधानमंत्री उज्वला योजना मधून गॅस जोडणी. सौभाग्य योजना मधून विद्युत जोडणी. या संबंधित योजनांचे त्या त्या स्तरावरील संबंधित अधिकारी यांच्याशी त्या त्या स्तरावरुन समन्वय, बैठका अथवा दूरध्वनीवरुन संवाद साधून चर्चा इत्यादीच्या माध्यमातून या योजनांचा लाभ घरकुलांच्या लाभार्थ्यांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**v. राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागधारकांची क्षमताबांधणी व जन–जागृतीद्वारे लोक चळवळ उभी करणे:–**

१) विविध कार्यशाळा, आढावा बैठका, सभा, प्रशिक्षणे, क्षेत्रीय भेटी, लाभार्थी मेळावे, बँक मेळावे, गृहभेटी, ई.मेल, पत्रव्यवहार इत्यादिंच्या माध्यमातून संबंधित भागधारकांची क्षमता बांधणी करणे.

२) यामध्ये सर्व भागधारकांचा सक्रिय सहभाग घेण्यासाठी, त्यांची जाणीव जागृती करण्यासाठी विविध प्रकारची मिडीया जसे मास मिडीया, प्रिंट मिडीया, सोशल मिडीया, आऊटडोअर मिडीया, पारंपारीक मिडीया, गृप मिडीया, आंतरव्यक्ती संवाद या माहिती शिक्षण व संवाद या माध्यमांव्दारे अभियानाची प्रचार व प्रसिध्दी करुन राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात लोक चळवळ उभी करणे. ज्यामुळे जनजागृती होऊन लोकांचा या क्षेत्रात सक्रिय सहभाग होईल आणि योजना अधिक गतिमान होतील.

यासाठी सर्व उपायुक्त (विकास), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), गट विकास अधिकारी, ग्रामसेवक इ. सर्व ग्राम विकास यंत्रणेचा सक्रिय पुढाकार आवश्यक राहील.

### ३. 'महा आवास अभियान - ग्रामीण' कालावधीत राबवावयाचे उपक्रम :

| अ. क्र. | राबवावयाचे उपक्रम | तपशिल | स्तर | जबाबदार अधिकारी / व्यक्ती |
|---|---|---|---|---|
| i | भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे (Land to Landless Beneficiaries) | ग्रामीण गृहनिर्माण योजनेंतर्गत गरजू, पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना अभियान कालावधीत शासनाच्या पुढील योजनांमधून जागा उपलब्ध करुन देण्यात यावी व त्यांची घरकुले पूर्ण करण्यात यावीत.<br>अ) पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना - ५०० चौ.फू. पर्यंतसाठी रु. ५०,०००/- पर्यंतचा लाभ मिळवून देण्यासाठीचे लाभार्थी शोधणे व मंजूर करुन घेणे, मोठ्या ग्रामपंचायती / शहराशेजारील ग्रामपंचायती मध्ये स्थानिक प्राधिकरणाच्या नियमावलीनुसार २ मजली (G + १) किंवा ३ मजली (G + २) इमारतींच्या भूखंडासाठी प्रति लाभार्थी रुपये ५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य देण्यात यावे. या योजनेचा लाभ लाभार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने देण्यात यावा. | ग्राम पंचायत स्तर<br>तालुकास्तर<br>जिल्हास्तर | सरपंच व ग्रामसेवक (ग्रामपंचायत)<br>गट विकास अधिकारी (पंचायत समिती)<br>प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) व कार्यकारी अध्यक्ष (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) |
| | | ब) शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याची योजना :- शोधलेल्या लाभार्थ्यांपैकी ज्या लाभार्थ्यांना जमिनीचा लाभ द्यावयाचा आहे त्यांना या योजनामधून लाभ मिळविण्यासाठी संबधित जिल्हाधिकारी कार्यालयाशी प्रस्ताव सादर करणे व पाठपुरावा करणे, | ग्राम पंचायत स्तर<br>तालुकास्तर<br>जिल्हास्तर | सरपंच व ग्रामसेवक (ग्रामपंचायत)<br>गट विकास अधिकारी (पंचायत समिती)<br>प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) व कार्यकारी अध्यक्ष (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | क) ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना :- या योजनेतील नियमानुसार गावठाणामधील अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरापासून जिल्हास्तरापर्यंत शुल्क जमा करुन घेणे, प्रमाणपत्र अदा करणे इ. कार्यवाही करुन पाठपुरावा करणे तसेच गावठाणाबाहेरील अतिक्रमणे नियमानुकूल करणेसाठी जिल्हास्तरीय समितीशी पाठपुरावा करणे. सध्या ज्या ठिकाणी अतिक्रमण आहे त्या ठिकाणी अतिक्रमण धारकांचे अतिक्रमण नियमानुकूल करणे शक्य किंवा योग्य नसल्यास अशा अतिक्रमणाचे पर्यायी जागेत पुनर्वसन करणे. | ग्राम पंचायत स्तर<br>तालुकास्तर<br>जिल्हास्तर | सरपंच व ग्रामसेवक (ग्रामपंचायत)<br>गट विकास अधिकारी (पंचायत समिती)<br>प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) , उपमुख्य कार्यकारी अधिकारी, पंचायत (जिल्हा परीषद) व<br>कार्यकारी अध्यक्ष (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) |
| | | ड) वा इतर मार्गाने (जसे –बक्षिसपत्र) जागा उपलब्ध करुन देणे. | ग्राम पंचायत स्तर | सरपंच व ग्रामसेवक (ग्रामपंचायत) |
| ii | घरकुलांच्या उद्दिष्टांप्रमाणे १०० टक्के मंजूरी देणे (Closing Gap Between Target and Sanction) | राज्यस्तरावरुन केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत सन २०१६-१७ ते २०२०-२१ पर्यंत वाटप करण्यात आलेल्या उद्दिष्टांना जागेची अनुपलब्धता, लाभार्थ्याची अनुत्सुकता, योजनेबद्दल पुरेशी माहिती नसणे इत्यादी कारणांनी घरकुलांना मंजूरी देता आली नसेल तर अशा कारणांची मिमांसा करुन त्यावर अभियान कालावधीत उपाययोजना करावी व १०० टक्के मंजूरी द्यावी. दिलेल्या उद्दिष्टांप्रमाणे लाभार्थ्याला लाभ देणे याला प्राधान्यक्रम देणे आवश्यक आहे, मात्र विविध उपयायोजना करुनही अशा घरकुलांना मंजूरी देता येत नसेल तर घरकुल रद्द करणेबाबत कार्यवाही करावी. | ग्राम पंचायत स्तर<br>तालुकास्तर<br>जिल्हास्तर | सरपंच व ग्रामसेवक, (ग्रामपंचायत)<br>गट विकास अधिकारी, (पंचायत समिती)<br>कार्यकारी अध्यक्ष (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) तथा मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) |
| iii | मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे १०० टक्के वितरण करणे (Closing Gap Between Sanction and 1st Instalment) | केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत सन २०१६-१७ ते २०२०-२१ मधील मंजूर घरकुलांना अभियान कालावधीत पहिल्या हप्त्याचे १०० टक्के वितरण विनाविलंब करावे. लाभार्थ्यांना घरकुलासाठी मंजूरी दिल्याबरोबर या लाभार्थ्यांचा मेळावा आयोजित करुन त्यांना घरकुलासाठी मंजूरी देण्यात आली आहे या बद्दल अवगत करुन देण्यात यावे व लाभार्थ्यांना घरकुल पूर्ण | ग्राम पंचायत स्तर<br>तालुकास्तर | सरपंच व ग्रामसेवक (ग्रामपंचायत)<br>सहायक लेखाधिकारी व गट विकास अधिकारी (पंचायत समिती) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | करणेबाबत असलेली जबाबदारीची जाणीव करुन देऊन घरकुल पूर्ण करण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या टप्प्यांची माहिती देण्यात यावी. पहिल्या हप्त्याचे प्रदान करणेपूर्वी बँक खात्याची पडताळणी करुन तात्काळ करारनामा करावा व पहिल्या हप्त्याचे प्रदान करण्यात यावे. | | |
| iv | घरकुलांच्या उद्दिष्टानुसार १०० टक्के घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण (Closing Gap Between Target Completion) करणे. | अभियान कालावधीत केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत सन २०१६-१७ ते २०२०-२१ मधील उद्दिष्टानुसार १०० टक्के घरकुलांचे काम भौतिकदृष्ट्या पूर्ण करावे. १०० टक्के घरकुले पूर्ण करुन घेताना लाभार्थ्यांना त्यांच्या कामाच्या टप्पानिहाय भौतिक तपासणी करुन, जीओ टॅगींग करुन, टप्पानिहाय हप्ते तात्काळ वितरीत करण्यात यावेत. यासाठी लाभार्थ्यांशी सतत संपर्कात राहून लाभार्थ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन देऊन घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करुन घेण्यात यावीत. | ग्राम पंचायत स्तर<br><br>तालुकास्तर | ग्रामसेवक (ग्रामपंचायत)<br>ग्रामीण गृहनिर्माण अभियंता<br>गट विकास अधिकारी (पंचायत समिती) |
| v | प्रलंबित घरकुले (Delayed Houses) पूर्ण करणे | प्रधानमंत्री आवास योजना -ग्रामीण अंतर्गत घरकुलांना पहिला हप्ता प्रदान केल्यापासून १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेल्या, मात्र अद्यापपर्यंत अपूर्ण असलेली प्रलंबित घरकुले (Delayed Houses) अभियान कालावधीत प्राधान्याने पूर्ण करणे व यापुढे अशा यादीमध्ये घरकुलांचा समावेश होणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रलंबित घरकुले राहू नये म्हणून यंत्रणेने लाभार्थ्यांशी सतत संपर्क ठेऊन त्यांना प्रोत्साहित करणे, कामाचा पाठपुरावा करणे, गरजेप्रमाणे लाभार्थी मेळावे घेणे व गृहभेटी देणे तसेच बांधकामासाठी आवश्यक साहित्य (उदा. वाळू), गवंडी, जमिन इत्यादी सर्व वेळेवर उपलब्ध होईल यासाठी प्रयत्न करणे. | ग्राम पंचायत स्तर<br>तालुकास्तर<br><br>जिल्हास्तर | ग्रामसेवक (ग्रामपंचायत)<br>ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, व गट विकास अधिकारी (पंचायत समिती).<br>प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा). |
| vi | सर्व घरकुले आर्थिकदृष्ट्या पूर्ण करणे (Financial completion) | केंद्र पुरस्कृत योजना व राज्य पुरस्कृत योजनांमधील सन २०१६-१७ ते २०२०-२१ मधील सर्व घरकुलांना भौतिक प्रगतीनुसार सर्व हप्ते प्रदान करून सर्व घरकुले आर्थिकदृष्ट्या पूर्ण करावीत. घरकुलांच्या भौतिक प्रगतीची वेळोवेळी तपासणी वेळोवेळी होऊन टप्पानिहाय फोटो काढणे, जिओ टॅगींग करणे तसेच आवाससॉफ्ट प्रणालीवर अहवाल अपलोड करुन हप्ते तात्काळ | ग्राम पंचायत स्तर<br><br>तालुकास्तर | ग्रामसेवक (ग्रामपंचायत)<br>ग्रामीण गृहनिर्माण अभियंता,<br>तालुकास्तरीय डेटा एन्ट्री ऑपरेटर, तालुका सहायक लेखा अधिकारी व गट विकास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | वितरीत करण्याची कार्यवाही विनाविलंब करावी. लाभार्थ्यांशी सतत संपर्कात राहून लाभार्थ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन देऊन घरकुलाचे निश्चित केलेले टप्पे विहित कालावधीत पूर्ण करुन सर्व हप्त्यांचे प्रदान करण्यात यावे व सदर घरकुले आर्थिकदृष्ट्या पूर्ण करुन घेण्यात यावीत. | जिल्हास्तर | अधिकारी (पंचायत समिती).<br>प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा). |
| vii | ग्रामीण गवंडी प्रशिक्षण (Rural Mason Training) पूर्ण करणे | प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण अंतर्गत गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत दिलेले उद्दिष्ट प्रशिक्षण देणाऱ्या (Training provider) संस्थांशी समन्वय ठेवून पूर्ण करुन कुशल गवंडी तयार करावेत. दिलेल्या उद्दिष्टानुसार गवंडी प्रशिक्षणासाठी इच्छुक प्रशिक्षणार्थ्यांची निवड करणे व ज्याठिकाणी प्रशिक्षण द्यावयाचे आहे तेथील लाभार्थ्यांची निवड करणे ही कार्यवाही तातडीने करुन प्रस्ताव राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयास तात्काळ सादर करुन मंजूर करुन घेणे. त्यानुसार प्रशिक्षण देणाऱ्या (Training provider) संस्थांशी समन्वय ठेवून प्रशिक्षण पूर्ण करुन घेणे. | ग्राम पंचायत स्तर<br>तालुकास्तर<br><br>जिल्हास्तर<br><br>राज्यस्तर | ग्रामसेवक (ग्रामपंचायत)<br>गट विकास अधिकारी (पंचायत समिती)<br>प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा)<br>संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृहनिर्माण कार्यालय |
| viii | डेमो हाऊसेस (Demo House) उभारणे | घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी जिल्ह्यास दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे पंचायत समिती आवारामध्ये जागा निश्चिती करणे व PIA च्या मदतीने पंचायत समिती निहाय सर्व डेमो हाऊसेस (Demo Houses) ची निर्मिती करणे. अभियानाच्या कालावधीत मा. आमदार यांचे हस्ते डेमो हाऊस ची पायाभरणी करण्यात यावी व अभियान कालावधीतच या डेमो हाऊसेसचे काम पूर्ण करुन अभियान समाप्तीच्या दिवशी लोकार्पण करण्यात यावे. | तालुकास्तर<br><br>जिल्हास्तर<br><br>राज्यस्तर | गट विकास अधिकारी (पंचायत समिती)<br>प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा)<br>संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृहनिर्माण कार्यालय |
| ix | कायमस्वरुपी प्रतिक्षा यादीमधील लाभार्थ्यांचे आधार सिडींग व आवास प्लस मधील लाभार्थ्यांचे आधार सिडींग/जॉब कार्ड मॅपींग १०० टक्के पूर्ण करणे (AADHAR | प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत कायम स्वरुपी प्रतिक्षा यादी ('ब' यादी) मधील लाभार्थ्यांचे आधार सिडींग व आवास प्लस ('ड' यादी) मधील कुटुंब प्रमुख व कुटुंबातील सदस्यांचे आधार सिडींग/जॉब कार्ड मॅपींग १०० टक्के पूर्ण करण्यात यावे. याकामी जिल्हास्तरीय डेटा एन्ट्री ऑपरेटर तसेच ग्राम पंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्राचे डेटा एन्ट्री ऑपरेटर यांची मदत घेण्यात यावी. आवास प्लस मधील लाभार्थ्यांचा जॉब कार्ड क्रमांक उपलब्ध | ग्राम पंचायत स्तर<br><br><br><br>तालुकास्तर | ग्रामसेवक, ग्रामपंचायत<br>आपले सेवा केंद्राचे डेटा एन्ट्री ऑपरेटर, डेटा एन्ट्री ऑपरेटर, ग्राम रोजगार सेवक<br>तालुकास्तरीय डेटा एन्ट्री ऑपरेटर, गट विकास अधिकारी (पंचायत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Seeding of PWL Awaas Plus / Job Card Mapping) | करुन घेण्यात यावा. ज्यांच्याकडे जॉब कार्ड क्रमांक नाही त्यांच्याबाबत ग्रामीण रोजगार सेवक यांच्याशी संपर्क साधून जॉब कार्ड क्रमांक मिळवून देणेबाबत सहकार्य करावे. | जिल्हास्तर | समिती)<br>सहायक प्रकल्प अधिकारी, नरेगा (पंचायत समिती)<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी, नरेगा (जिल्हा परीषद) |
| X | शासकीय योजनांशी कृतीसंगम (Convergence) व नावीन्यपूर्ण उपक्रमांची (Innovative/ Best Practices) अंमलबजावणी करणे | केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे लाभार्थी यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा कृतीसंगम करुन संख्यात्मक व गुणवत्तात्मक वाढ करणे | | |
| | i. शासकीय योजनांशी कृतीसंगम करुन लाभार्थ्यांना | अ) **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने** मधून रोजगार व **स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण** मधून शौचालय उपलब्ध करुन देण्यात यावे. हे करताना घरकुलाचे काम सुरु करण्यापूर्वी रोजगार मस्टर तयार करुन समन्वयाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे लाभार्थी यांना लाभ मिळवून देणे. तसेच स्वच्छ भारत मिशन-ग्रामीणबाबत प्रस्ताव सादर करुन योजनेचा लाभ मिळवून द्यावा. | ग्राम पंचायत स्तर<br>तालुकास्तर<br>जिल्हास्तर | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ग्राम रोजगार सेवक, ग्राम सेवक (ग्रामपंचायत).<br>गट विकास अधिकारी, उपअभियंता (पाणीपुरवठा) (पंचायत समिती)<br>प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता विभाग, जिल्हा परीषद), उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) नरेगा. |
| | | ब) **जल जीवन मिशन** मधून ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे लाभार्थी यांना नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा उपलब्ध करुन देण्यात यावा. या संदर्भामध्ये जल जीवन मिशनचे ग्रामीण पाणी पुरवठा अधिकाऱ्याशी समन्वय ठेवून काम करावे | ग्राम पंचायत स्तर<br>तालुकास्तर | सरपंच व ग्रामसेवक (ग्रामपंचायत)<br>गट विकास अधिकारी (पंचायत समिती) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | जिल्हास्तर | प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता विभाग, जिल्हा परीषद), कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परीषद). |
| | | क) **प्रधानमंत्री उज्वला योजने** मधून ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे लाभार्थी यांना गॅस जोडणी देण्यात यावी. अर्जदाराचा अर्ज व कागदपत्रे शिधावाटप अधिकाऱ्यामार्फत संबंधित गॅस एजन्सीला देण्यात यावी व गॅस जोडणी देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी. | ग्राम पंचायत स्तर<br>तालुकास्तर<br><br>जिल्हास्तर | सरपंच व ग्रामसेवक (ग्रामपंचायत)<br>गट विकास अधिकारी (पंचायत समिती)<br>प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) व जिल्हा पुरवठा अधिकारी. |
| | | ड) **सौभाग्य योजने** मधून ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे लाभार्थी यांना विद्युत जोडणी देण्यात यावी. या संदर्भामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचेशी समन्वय ठेवनू कार्यवाही करण्यात यावी. | ग्राम पंचायत स्तर<br>तालुकास्तर<br><br>जिल्हास्तर | ग्राम सेवक (ग्रामपंचायत)<br>गट विकास अधिकारी (पंचायत समिती) व उपअभियंता (महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित)<br>प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) |
| | | इ) **राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियाना** मधून ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे लाभार्थी उपजिविकेचे साधन उपलब्ध करुन देण्यात यावे. याकामी राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानचे संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय ठेवून कार्यवाही करण्यात यावी. | ग्राम पंचायत स्तर<br><br>तालुकास्तर | ग्राम सेवक (ग्रामपंचायत),<br>समूह संघटक (CRP)<br>ब्लॉक मिशन अधिकारी (MSRLM) व गट विकास अधिकारी (पंचायत समिती) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | जिल्हास्तर | डिस्ट्रीक्ट मिशन मॅनेजर (MSRLM), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) |
| | ii. नाविन्यपूर्ण उपक्रम | अ) **बहुमजली इमारती बांधणे :-** घरकुलासाठी पुरेशी जागा नसल्यास बहुमजली इमारती बांधणे या सारखे उपक्रम राबवावेत. यासाठी संबंधित ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांचा गट तयार करुन त्यांच्या सहमतीने G+१ किंवा G+२ बहुमजली इमारतीचे नियोजन करण्यात यावे. | ग्राम पंचायत स्तर<br>तालुकास्तर<br><br>जिल्हास्तर | सरपंच व ग्राम सेवक, ग्रामपंचायत<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा |
| | | ब) **गृहसंकुल उभारणे :-** ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे लाभार्थी यांचेकडे घरकुलासाठी पुरेशी जागा असल्यास गृहसंकुल उभारुन त्यांची सहकारी संस्था स्थापने त्यासाठी लाभार्थ्यांना प्रवृत्त करुन मार्गदर्शन करावे व पुढील कार्यवाही करण्यात यावी. सदर गृहसंकुलाची सहकारी गृह संस्था म्हणून स्थापना करण्यात यावी. | ग्राम पंचायत स्तर<br>तालुकास्तर<br><br><br>जिल्हास्तर | सरपंच व ग्राम सेवक, ग्रामपंचायत<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>सहायक निबंधक, सहकारी संस्था<br>प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा |
| | | क) **बँक गृह कर्ज :-** ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी बँकेचे रु. ७०,०००/- गृह कर्ज मिळवून देण्यात यावे. यासाठी इच्छुक लाभार्थ्यांना मार्गदर्शन करुन संबंधित बँकेबरोबर त्यांची जोडणी करुन द्यावी व त्यांना कर्ज मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन करण्यात यावे. यासाठी तालुकास्तरीय BLBC व जिल्हा DLBC लेवल बँकर्स कमिटीमध्ये ग्रामीण गृहनिर्माण योजनेमधील लाभार्थ्यांना कर्ज मिळवून देणेसंबधी विषय ठेवून लाभार्थ्यांना रु. ७०,०००/- पर्यंत गृहकर्ज मिळवून द्यावे. | ग्राम पंचायत स्तर<br>तालुकास्तर<br><br>जिल्हास्तर | सरपंच व ग्राम सेवक, ग्रामपंचायत<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ड) **घरकुल मार्ट :–** ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांना घरकुलांचे बांधकाम साहित्य जसे– दगड, विटा, वाळू, सिमेंट, स्टिल, छताचे साहित्य इ. उपलब्ध करण्यासाठी 'घरकुल मार्ट' सुरु करुन त्यात महिला बचत गटांचा सहभाग करुन घ्यावा. घरकुलासाठी ५ ब्रास वाळू मोफत उपलब्ध करुन देण्यासाठी तहसिलदार यांच्याशी समन्वय ठेवून कार्यवाही करावी तसेच राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान व माविम या संबंधितांशी समन्वय साधून 'घरकुल मार्ट' सुरु करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी. | ग्राम पंचायत स्तर<br><br>तालुकास्तर<br><br>जिल्हास्तर | सरपंच, ग्राम सेवक (ग्रामपंचायत)व तलाठी<br>गट विकास अधिकारी (पंचायत समिती) व तहसिलदार,<br>प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), निवासी उप जिल्हाधिकारी |
| | | इ) **आदर्श घरांची निर्मिती :–** पंचायत राज संस्था (जिल्हा परीषद, पंचायत समिती, ग्राम पंचायत), स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था, कॉरपोरेट संस्था, लाभार्थी व लोक सहभाग यांच्या माध्यमातून मुलभूत सुविधा देवून ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांसाठी 'आदर्श घरांची' निर्मिती करण्यात यावी. आदर्श घरांची निर्मिती करताना इथे आवश्यक मुलभूत सुविधा जसे अंतर्गत रस्ते, गटर व्यवस्था, पथ दिवे, सांडपाणी/ घनकचरा व्यवस्थापन इ. बाबत जिल्हा परीषद, पंचायत समिती व ग्राम पंचायत यांच्या सेस फंडामधून वा इतर योजनांमधून मदत उपलब्ध करुन घेण्यात यावी. | ग्राम पंचायत स्तर<br>तालुकास्तर<br><br>जिल्हास्तर | सरपंच व ग्राम सेवक (ग्रामपंचायत)<br>गट विकास अधिकारी (पंचायत समिती)<br>प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), मुख्य कार्यकारी अधिकारी, (जिल्हा परिषद) व अध्यक्ष (जिल्हा परिषद) |

## ४. 'महा आवास अभियान – ग्रामीण' अंमलबजावणीसाठी क्षमताबांधणी कार्यक्रम :

| अ. क्र. | कार्यशाळा / स्तर अपेक्षित कालावधी | कार्यशाळेसाठी अपेक्षित अध्यक्ष आणि मान्यवर | कार्यशाळेसाठी अपेक्षित सहभागी प्रशिक्षणार्थी | आयोजक संस्था इ. |
|---|---|---|---|---|
| १ | राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा<br>दिनांक २० नोव्हेंबर, २०२० | **मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते**<br>खालील मान्यवर यांचे प्रमुख उपस्थितीत<br>• मा. उप मुख्यमंत्री,<br>• मा. मंत्री (ग्रामविकास)<br>• मा. मंत्री (महसूल)<br>• मा. मंत्री (आदिवासी विकास)<br>• मा. मंत्री (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य)<br>• मा.राज्यमंत्री (ग्राम विकास व महसूल),<br>• मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन<br>• मा. अतिरीक्त मुख्य सचिव (ग्राम विकास व पंचायत राज विभाग),<br>• मा. अतिरीक्त मुख्य सचिव (महसूल विभाग),<br>• मा. सचिव (आदिवासी विकास विभाग),<br>• मा. प्रधान सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग),<br>• आयुक्त (आदिवासी विकास)<br>• आयुक्त (समाज कल्याण)<br>• आयुक्त (कामगार)<br>• संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृहनिर्माण | • विभागीय आयुक्त, सर्व,<br>• जिल्हाधिकारी, सर्व,<br>• मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) सर्व<br>• प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सर्व<br>• राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी,<br>• बँक प्रतिनिधी,<br>• मिडीया प्रतिनिधी, इत्यादीं | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष–ग्रामीण गृहनिर्माण हे या कार्यशाळेचे आयोजन व अभियानाचे सादरीकरण करतील. |
| २ | विभागस्तरीय कार्यशाळा<br>दिनांक २१ नोव्हेंबर २०२० ते २७ नोव्हेंबर २०२० या | **अध्यक्ष :– संबंधित विभागीय आयुक्त** खालील मान्यवर यांचे प्रमुख उपस्थितीत<br>• जिल्हाधिकारी,<br>• मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद),<br>• अतिरिक्त आयुक्त (सामाजिक न्याय), | • प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा)<br>• प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प)<br>• सहायक आयुक्त (समाज कल्याण) | उप आयुक्त, विकास, विभागीय आयुक्त कार्यालय हे या कार्यशाळेचे आयोजन व अभियानाचे सादरीकरण करतील.<br>सदर कार्यशाळेस राज्यस्तरावरुन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
